**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

## प्रेसनोट दिनांक – १२/०६/२०२४

**दि. ११/०६/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ३०२/२०२४ भादविक ३०२, ३४, भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५),(२७) महाराष्ट्र पोलीस अधि. ३७ (१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०६/२०२४ रोजी २३/४५ वा. सुमारास कॅनबे चौकाकडुन २०० मिटर अंतरावर तुळजाभवानी स्क्रॅप सेंटर समोरील रोडवर तळवडे ता. हवेली जि. पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ११/०६/२०२४ रोजी ०९/५९ वा |
| फिर्यादी | :- | मोनेश यंकप्पा भंडारी वय-२२ वर्षे धंदा-व्यवसाय रा.गुलमोहर हौसिंग सोसायटी,ए-विंग रुम.नं ७१४ परंडवाल चौका जवळ, देहुगाव ता.हवेली जि.पुणे |
| आरोपी | :- | २ अनोळखी व त्यांचे इतर अज्ञात साथीदार **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी काळया रंगाच्या पल्सर गाडीवरील दोन इसमांनी रनिंगमध्येच फिर्यादीं यांचे दाजी निलेश ऊर्फ मुकुंद अशोक भंडारी ,वय ३६ वर्षे यांचे मोटार स्कुटीला धक्का देऊन खाली पाडुन त्यांना मारहान करण्यास सुरुवात केली. त्यामुळे फिर्यादींचे दाजी घाबरुन रस्ता क्रॉस करुन रस्त्याच्या विरुध्द दिशेला पळाले तेंव्हा सदर दोन इसम व त्यांचे इतर साथीदार यांनी आपसात संगणमत करुन फिर्यादींचे दाजींस गाठुन अज्ञात कारणांवरुन कोयत्याने व चाकुने फिर्यादींचे यांचे डोक्यात तसेच कपाळावर, गालावर, छातीवर कापीव स्वरुपाच्या अनेक गंभीर जखमा करुन त्यातील दोन जणांनी फिर्यादींचे दाजीस रस्त्याचे बाजुला पडलेले बांधकामाचे सिंमेंटच्या गटुने व दगडाने डोक्यात मारुन त्यांना जिवे ठार मारले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | वपोनि वाघमारे ९८७०२०९९६६ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एम.आय.डी.सी ३७०/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०६/२०२४ रोजी १६.४७ वा चे सुमारास गाव वासुली तलाठी कार्यालय ,ता.खेड,जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०६/२०२४ रोजी ०२.२७ वा |
| फिर्यादी | :- | निवास काशिनाथ टेमगिरे,वय-२९ वर्षे, व्यवसाय-शेती.रा.शिंदे गाव,पोस्ट वासोली ता.खेड, जि.पुणे. |
| आरोपी | :- | श्री.सतिष संपतराव पवार ,वय -५२ वर्षे पद-तलाठी सजा वासुली, गाव वासुली ता.खेड जि.पुणे रा.युनिक हौसिंग सोसायटी ,फ्लॅट नं.१८ देहुरोड, पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांच्या वडीलोपार्जीत शेत जमिनीच्या ७/१२ वर त्यांच्या वडीलांचे ,भावाचे व त्यांचे नाव दुरुस्ती करण्यात आली असुन सदर सातबारा उता-यावर त्यांची नावे दिसत आहेत परंतु ऑनलाईन सिस्टीमला सदर ७/१२ उता-यावर फिर्यादी यांचे नाव दिसत नाही.तक्रारदार यांचे नाव ऑनलाईन ७/१२ उता-यावर दिसावे त्यासाठी तडजोडी अंती २०,०००/- रुपयेची लाच रक्कम पंचासमक्ष मागणी करुन स्विकारली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि निंबाळकर ला प्र वि पुणे ९५५२५७४१४० |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ७०७/२०२४ भादविक ३५४,३२४, ३२३,५०४, ५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०६/२०२४ रोजी २१.०० वा. सुमारास क्षितीज कॉलनी लेन नं २ जगताप डेअरी चौक वाकड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ११/०६/२०२४ रोजी ०५.०८ वा |
| फिर्यादी | :- | अनिता रमेश चाफेकर, वय - ५५ वर्षे, धंदा - शिवणकाम, रा. क्षितीज कॉलनी लेन नं २ जगताप डेरी चौक वाकड पुणे |
| आरोपी | :- | राजेश रमेश चाफेकर, वय ३५ वर्षे धंदा - काही नाही, रा.सदर<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा लहान मुलगा नमुद आरोपी याने फिर्यादी घरी असताना दारु पिऊन येऊन मला दारु पिण्यास पैसे दे असे म्हणुन फिर्यादीस हाताने मारहाण केली. व फिर्यादी यांचे अंगातील गाऊन फाडुन फिर्यादीला रस्त्यावर फरफटत नेऊन फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले तसेच फिर्यादी यांनी त्यांचा मोठा मुलगा नामे प्रविण यास बोलावुन घेतले असता आरोपी ने त्यास शिवीगाळ केली. घरातील कापड कापण्याची कैची त्याचे हातावर मारुन त्यास ही जखमी केले. तसेच तुम्हा दोघांना सोडणार नाही अशी धमकी दिली व शेजारील महीला हे सोडविण्यास आले असता त्यांना सुध्दा शिवीगाळ करुन धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पवार ९८२३५४१०७६ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव १६४/२०२४ भा.द.वी कलम ३०८,१०७,१४३,१४७,१४८,१४९,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०६/२०२४ रोजी २१.०० वा.चे सुमारास गहुंजे येथील भंगारचे दुकानावर ता.मावळ जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/०६/२०२४ रोजी ०७/२३ वा |
| फिर्यादी | :- | मोहम्मद इस्लाम जमीर मुल्ला खान वय ३७ वर्षे धंदा-भंगार रा.गंहुजे ता.मावळ जि.पुणे |
| आरोपी | :- | १)नाना (पुर्ण नाव माहित नाही) २)नवनाथ महादेव शिंदे वय २१ वर्षे धंदा-रिक्षा चालक रा. वाघजाई सोसा. साईनगर गहुंजे ता.मावळ जि.पुणे मुळ रा.गौरीपाडा दत्तमंदिर चाळ<br>**आरोपी निष्पन्न-** ३)इरसाद अदिल खान रा.साईनगर गहुंजे ता.मावळ जि.पुणे, ४).शेखर मोहन शिंदे रा.सांगवडे ता.मावळ जि.पुणे, ५)धिरज बाळु बनसोडे रा.आंबी ता.मावळ जि.पुणे, ६)अनुराग यशवंत गायकवाड रा.आंबी ता.मावळ जि.पुणे, इतर अनोळखी इसम<br>**आरोपी क्रं १,३, ४,५,६ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे भंगारचे दुकानावर फिर्यादी व फिर्यादीचा मित्र योगेश चाटे असे असताना फिर्यादीचे ओळखीचे आरोपी क्र.१ व २ तसेच इतर आरोपी हे फिर्यादी जवळ येवुन मुंबई पुणे हायवे रोडजवळ फायर टेशन येथे पितळ पोत्यामध्ये भरुन ठेवले आहे.ते आम्हाला आणता येत नाही .तुम्ही आमच्या सोबत चला असे म्हणाले म्हणुन फिर्यादी व फिर्यादीचा मित्र त्यांच्या सोबत गेले त्यावेळी भंगार शेडचे जुन्या भांडणाच्या कारणावरुन इरसाद खान याचेच सांगणे वरुन नमुद आरोपी यांनी आम्हास शिवीगाळ करुन दोन इसमाने त्याचे हातातील लाकडी दांडक्याने फिर्यादीचे खांदयावर मारुन एका इसमाने लोखंडी कोयत्याने फिर्यादीचे डोक्यावर मारल्याने मृत्यु होवु शकतो यांची जाणीव असताना कोयता मारत असताना कोयत्याचा वार चुकवुन पळुन गेलो तसेच इतर सर्वानी फिर्यादीला शिवीगाळ दमदाटी व जिवे मारण्याची धमकी देवुन तेथुन ते पळुन गेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि लोहेकर ८२०८५१६४४८ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ३०३/२०२४ भादवि कलम ४५२,३२४, ३२३,५०४, ५०६,१४३, १४७,१४८, १४९ , महाराष्ट्र पोलीस अधि.३७(१) (३) १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०६/२०२४ रोजी १०/३० वा चे सुमारास चव्हाणनगर भाग २ देहुगांव ता. हवेली जि. पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०६/२०२४ रोजी १२.१५वा. |

फिर्यादी :- श्री. रमाकांत शिवाजी तिडके वय ३६ वर्षे धंदा कारपेंटर रा. चव्हाणनगर भाग २ फोर स्कुलशाळेच्या मागे, देहुगांव ता. हवेली जि. पुणे

आरोपी :- १)तेजस चंदरकांत कोरडे वय १९ वर्ष
२)साईराज अभिमन्यु देशमुख, वय २० वर्ष
३) अभय लक्ष्मन लंगडे, वय १९ वर्ष रा. चव्हाणनगर भाग २ देहुगाव ता.हवेली जि.पुणे मुळ रा.मु.पो गौर.ता.कळंब,
जि.धाराशिव
इतर ४ ते ५ साथीदारांनी
**आरोपी क्रं १ ते ३ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे शेजारी राहणारे फिर्यादी यांचे तोंड ओळखीचे इसम नमुद आरोपी यांनी व त्यांचे इतर ४ ते ५ साथीदारांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करुन जुन्या भांडणाच्या कारणावरुन फिर्यादीचे घरामध्ये घुसुन आरोपी क्रं १ याच्या काळेवाडीच्या मिआने हॉकीस्टीने मारुन फिर्यादीस ईच्छापुर्वक जखमी केले, फिर्यादीचे पत्नीला ,आईला व मुलगा रिषभ यांस हाताने व लाथाबुक्यांनी जोर जोरात मारुन किरकोळ जखमी करुन वाईट वाईट शिवीगाळ करुन त्याचेतील कोणीतरी अभयच्या नादाला लागला तर कुटुंबांसह मारुन टाकीन अशी धमकी दिली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा /१३६९ ठोकळे मो.नं.९०७५५८४११०

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ४०४/२०२४ भादवि कलम २७९,३३८,३०४(अ) मो वा का कलम १३४,१८७,१८४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०६/२०२४ रोजी २२.०० वा पुणे-नाशिक रोड वरील चाकण ता खेड जि पुणे येथील तळेगाव चैकातील कोहिनुर सेंटर चैधरी ढाब्याजवळ

गुन्हा दाखल :- दि. ११/०६/२०२४ रोजी ०१/४९ वा

फिर्यादी :- ओमकार बाजीराव कुलाळ वय १९ वर्शे धंदा अँम्ब्युलन्स ड्रायव्हर , राक्षेवाडी, चाकण , ता-खेड जि पुणे

आरोपी :- अज्ञात वाहना वरील अज्ञात इसम

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी पुणे नाशिक रोडवरील चाकण ता खेड जि पुणे येथील तळेगाव चैाकातील कोहिनुर सेंटर चौधरी ढाब्याजवळ हायवे रोडचे कडेला एक अनोळखी इसम वय अंदाजे ३० वर्ष नाव पत्ता माहीत नाही यास कोणत्यातरी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अपघात करुन त्याचे किरकोळ व गंभीर दुखापती होवुन त्याचे मुत्युस कारणीभुत होवुन उपचारासाठी घेवुन न जाता तसेच अपघाताची खबर न देता पळुन गेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि मोरे ९८५०४८२०२०

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी २५९/२०२४ भा.द.वी कलम ४०६,४२०,३४ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२३/०५/२०२३ रोजी ते आज पर्यंत फ्लॅट नं.४०२,ए बिल्डींग,ओरिएंट या सोसायटी,पिंपळे सौदागर पुणे.

गुन्हा दाखल :- दि.११/०६/२०२४रोजी १९/११ वा

फिर्यादी :- अमित अशोक कपुर वय-४० वर्षे धंदा-नोकरी,रा.फ्लॅट नं.बी-१०१, ओरिएंट बिल्डींग,सर्वे नं.७६,पिंपळे सौदागर ता.हवेली जि.पुणे-२७.

आरोपी :- १) सविता रविंद्र बाजारे वय-४३ वर्ष, धंदा-नोकरी, रा.फलॅट नं- ३०२,सुंदरम बिल्डींग,वाघेरे हाईटस,पिंपरी गाव पुणे-२७. २) रविंद्र बाजारे रा.सदर **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी एकत्रितपणे कट रचुन संगनमत करुन पहिल्यांदा फिर्यादी यांना फलॅट विकण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी यांचेबरोबर एम.ओ.यु व ॲग्रीमेंट टु सेल असा कायदेशिर करार करुन विश्वास संपादन केला त्यानंतर एल.ॲण्ड.टि.फायनान्स कंपनीला ७१,००,०००/- रुपये भरण्यास सांगितल्याने त्यांच्यावर विश्वास ठेवुन ७१,००,०००/- रुपये एल.ॲण्ड.टि.फायनान्स कंपनीला दिले तसेच ॲग्रीमेंट टु सेल करण्यासाठी रजिस्ट्रेशन फी ५,८३,०००/- रुपये आम्ही भरले असुन असे ७६,८३,००० रुपये भरल्यानंतर त्या फ्लॅटवरील बँकेचा असलेला कर्जाचा बोजा आरोपीत यांनी नील करुन त्यांनी अप्रामाणिकपणे फिर्यादी यांचेकडुन आर्थिक फायदा करुन घेतला त्यानंतर ते फिर्यादी यांचेबरोबर कायदेशिर कराराबरोबर प्रमाणे न वागता कायदेशिर करारभंग करुन आमचा विश्वासघात करुन आर्थिक फसवणुक केली आरोपी यांनी या फ्लॅटचे डीड ऑफ

असाईमेंट लिहुन व नोदवुन न दिल्यामुळे व या फ्लॅटचे मुळ कागदपत्रे आम्हास न दिल्यामुळे गृहकर्ज घेतलेल्या ॲक्सीस बँकेला विकत घेतलेल्या फलॅटची कागदपत्रे देता येत नाही तसेच फिर्यादी यांनी घेतलेल्या कर्जाचा हप्ता आम्ही स्वतः भरीत असुन फिर्यादी यांचे कुटुबियांना मानसिक,शारिरिक व आर्थिक त्रास होत आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि भोगम ९६८९४८३०७९

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- शिरगाव १६३/२०२४ भा.द.वी कलम ३२६,३२३, ५०४,५०६, ३४ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०६/२०२४ रोजी २१.१५ वा च्या दरम्यान लोंढा सोसायटी गंहुजे ता.मावळ जि पुणे

गुन्हा दाखल :- दि ११/०६/२०२४ रोजी ०६/०० वा

फिर्यादी :- नवनाथ महादेव शिंदे वय २१ वर्षे धंदा-रिक्षा चालक रा.अजिनाथ सावंत राहत्याघरी वाघजाई सोसा.साईनगर गहुंजे ता.मावळ जि.पुणे

आरोपी :- १.ईसलाम जमिनउल्ला खान ,वय ३७ वर्षे व्यवसाय- भांगार दुकाण रा.नितीन सुदाम बोडके यांच्या भाडयाच्या रूममध्ये गहुंजे ता.मावळ जि.पुणे मुळ रा.लोटा जि.सिध्दार्थनगर उत्तर प्रदेश
२) योगेश प्रल्हाद चाटे ,वय २३ वर्षे व्यवसाय- सेक्युरीटी गार्ड रा.नाना बोडके यांच्या भाडयाच्या रूम मध्ये गहुंजे ता.मावळ जि.पुणे मुळ जि.हिंगोली
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांची अँटो रिक्षा क्र एम.एच.१४/के.यू-५५१५ ही घेऊन व फिर्यादीचा मिञ नाना हा त्याची रिक्षा घेऊन बोलत असताना गंहुजे गावाच्या बाजुने दोन ईसम त्यापैकी एकाच्या हातात लाकडी दांडके दिसले.त्यापैकी एक व्यक्ती मोठयाने ओरडत होता की,पाठीमागुन दोन व्यक्ती कोयते घेवुन मारण्यास येत आहेत लवकर पळा.असा आवाज ऐकल्यावर फिर्यादी व नाना आमच्या अँटो रिक्षा चालु करण्याच्या प्रयत्नात असताना नानाची रिक्षा चालु न झाल्याने मारण्याचे भितीने रिक्षामधुन उतरून मंञा सोसायटीच्या दिशेने पळत असताना,फिर्यादीचा चिखलामध्ये पाय घसरून फिर्यादी पडले तेव्हा तेथे दोन लोक पळत आले व त्यांनी फिर्यादीला तेथुन पकडुन ओढत नेत असताना दुस-या व्यक्तीने त्याच्या हातातील लोखंडी कोयत्याने फिर्यादीचे उजव्या हाताच्या करंगळी व शेजारील बोटाचे मध्ये लोखंडी कोयत्याने वार करून फिर्यादीला गंभीर व किरकोळ जखमी करुन तु आम्हाला मारायला येतो का असे बोलुन फिर्यादीला शिवीगाळ करून व जिवे मारण्याची धमकी देवुन ते निघुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि लोहेकर ८२०८५१६४४८

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ३४०/२०२४ भा.दं.वि. कलम ३२६, ५०४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०६/२०२४ रोजी १६/०० वा चे सुमारास आरोपी चे घरासमोर इंद्रप्रस्थ गार्डन जवळ पाटीलनगर चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दि.११/०६/२०२४ रोजी १३/५२ वाजता.

फिर्यादी :- प्रशांत सत्यवान तुपे,वय २२ वर्षे, धंदा .रिक्षा ड्रायव्हर रा. सी/ओ अतुल चव्हाण धर्मराज नगर, पाटीलनगर चिखली पुणे

आरोपी :- अजय अशोक कांबळे वय अंदाजे २३ वर्षे रा.इंद्रप्रस्थ गार्डन जवळ पाटीलनगर चिखली पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी , नमुद आरोपी अजय कांबळे, व बाबु हिरे असे दारु पिण्यासाठी एम. डी हॉटेल म्हाळुंगे पुणे येथे गेले असता तेथे नमुद आरोपी यांने एका भैयाकडुन जबरदस्तीने त्याचा मोबाईल व पाकीट काढुन घेतले होते.फिर्यादीने आरोपीस त्याचा मोबाईल व पाकीट परत कर म्हणाले होते तेंव्हा आरोपीने त्याचे पाकीट परत केले परंतु मोबाईल परत केला नाही. तेंव्हा पुन्हा फिर्यादीने ते चिखली येथे आले नंतर आरोपी यास भैयाचा मोबाईल परत देवुन टाक असे म्हणाले असता त्यावर चिडुन जावुन आरोपी यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन त्याचे जवळील चाकुने पोटात,पाटीवर, डोक्यात, दोन्ही हातावर वार करुन गंभीर जखमी केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि देवकर ९६५७८०४६५५

१०.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड २५२/२०२४ भा.दं.वी. कलम ३०४ (अ)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०६/२०२४ रोजी सकाळी ११/०० वाजेचे सुमारास सह्याद्री कॉलनी बिजलीनगर चिंचवड पुणे

गुन्हा दाखल :- दि. ११/०६/२०२४ रोजी २०/११ वा.

फिर्यादी :- राहुल बबन सोळंके वय २५ वर्षे,धंदा- बिगारी, रा.श्रीराम कॉलनी न.४ बिजलीनगर चिंचवड पुणे

आरोपी :- अफसर इब्राहिम शेख वय ४९ वर्ष धंदा-बांधकाम ठेकेदार .श्रीरामकॉलनीनं ३ बळवंतनगर बिजलीनगरचिंचवड पुणे

**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी ठेकेदार याने चौधरी व बनसोडे यांचे बांधकाम साईटवर,उंचीवरील भींतीवर पाड बांधण्यासाठी लागणारे सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही साहीत्य न पुरवता. बांधकाम साईडच्या वरुन गेलेली ईलेक्ट्रीक तारेच्या ठिकाणी भींतीला प्लॅस्टर करण्यासाठी पाड बांधण्यास सांगुन फिर्यादीचा भाउ प्रताप बबन सोळंके वय २२ वर्ष धंदा-बिगारीकाम रा.श्रीरामकॉलनीनंबर ४ बिजलीनगरचिंचंवड पुणे मुळपत्ता- कॉटन मार्केट गणपती मंदिरजवळ यवतमाळ याचे जीवीताची कोणतीही खबरदारी न घेता त्यास काम करण्यास सांगुन त्यामध्ये त्याचे कपाळास ईलेक्ट्रिक तारेचा संपर्क होवुन त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि गोडसे ७७९८८२५७१०

११.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ७३१/२०२४ भा.द.वि कलम -४०६,४२० माहिती तंत्रज्ञान आधिनियम २००० चे कलम ६६(क), ६६(ड) प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/०४/२०२४ रोजी ते १६/०५/२०२४ रोजी पर्यंत बावधन पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.११/०६/२०२४ रोजी १९.३३ वा

फिर्यादी :- महीला फिर्यादी धंदा-नोकरी. रा.स्टारगेज अपार्टमेंट, बावधन पुणे

आरोपी :- 1) A-542 Marwadi Finacial Services Club u Mr. nareshkumar Jadeja (+1415)7405506 and ms. Shivagi Aggarwal (+917397520795, +919042580794, +919416146276)
2) F18/IOP ( Block trading research sharing Mr. Jai Sahani (address: unknown; Mob: +919548792748), Ms. Aria Sharma (address: unknown, Mob: +919482527320/+918768278502/+919482458587 and Mr. Gautam Singh (address: unknown, Mob: +917668493144/ +919458992500/ +917381984958/ +919570436468),
3) ATFX Wealth Investment CG Mr. Sanjay Kulkarni (address: unknown; Mob: +918125026168), Mr. Roi David Varich (address: unknown, Mob: +917081837996], and Mr. Shubham Gadge (Address: unknown, Mob: +918600261682) 4) JM Training Camp u Group 68-69 Mr. Vincent Camerlynck (address: unknown; Mob: +447415857481,+447423462059), Ms. Joyce(address: unknown, Mob: +447496005845, +447437573627), Mr. Narayanan Ramakrishnan (Address: unknown, Mob: +447437573627) and Mr. Anup Tiwari (address: unknown, Mob: +917799427355, +918695424310)
5) 41 unstoppable stocks Mr. Rohan Kulkarni (address: unknown; Mob: +1(623)2176710, +1(307)2201965), Ms. Aishwarya(address: unknown, Mob: +919981404863), Ms. Deepa (Address: unknown, Mob: +917319572780), Ms. Priya(Address: unknown, Mob: +91384156393) and Ms. Indira (address: unknown, Mob: +919981858405) मोबाईल धारक

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांचे बावधन पुणे येथे राहते घरी असताना फिर्यादीचे मोबाईल वरील फेसबुक ॲपवरती एक लिंक पाठवुन फिर्यादी यांचा मोबाईल नंबर नमुद केलेले व्हॉटसअॅप ग्रुपला ॲड करुन फिर्यादी यांचे शेअर्स मार्केटींगचे अकाऊंट ओपन करुन फिर्यादी यांना शेअर्स माक्रेटींगमध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन एकुण- १,२६,१६,५६१/- रुपयांची फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने घेवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन आर्थीक फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि थोरात ९८२१९९२९९२

१२.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ७०९/२०२४ भा.द.वि.कलम ४०६, ४१९, ४२० सह माहिती तत्रंज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६सी, ६६डी, प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२६/०४/२०२४ ते ०७/०६/२०२४ रोजी दरम्यान कस्पटे वस्ती. वाकड पुणे. येथे

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | दि.११/६/२०२४ रोजी २२/३५ वा |
| फिर्यादी | :- | फिर्यादी पुरुष धंदा- नोकरी रा. कस्पटे वस्ती. वाकड पुणे |
| आरोपी | :- | १.व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप१ चालक रमण सिंघानीया मो.नं. ९७१७०६८४५२<br>२.व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप२ चालक संदिप पाटील +8869839718<br>३.व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप३ मधील महिला नामे तनुश्री पुर्ण नाव माहीत नाही मो. नं. ७०४४८९३०६८<br>४.व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप ४ मधील हेमा अजहर जेएफआर मो.नं. ९९५१६२१७५६. व.देवांश दिक्षीत ८४०१११४२९३<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फेसबुक अंकाऊटवर मिळालेल्या बनावट लिंक व्दारे व्हाट्सअप वरील बनावट 1) 5paisa S73 value investment portfolio 2) 5paisa customer care 1 AETM 3) Tanushree-103 4) JFR-G306 indian business school या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपला फिर्यादी यांना जॉईन करून घेवुन आरोपी मजकुर यांनी शेअर्स खरेदी करणे व त्याची विक्री करणे याबाबत मार्गदर्शन करून हे शेअर खरेदी केल्यास तुम्हाला प्रॉफीट होईल असे अमिष दाखवुन 1)app.five-paisa.cc/ 2) app.jfrinvestors.in/ या लिंक पाठवुन त्याव्दारे स्टॉक व आयपीओ मध्ये गुतंवणुक करण्यास सांगुन फिर्यादी यांनी त्यांनी सागिंतलेले शेअर्सवर विश्वास ठेवुन टप्याटप्यानी एकुण ६४,५५,९०२/- रू रूपये भरण्यास सांगुन फिर्यादी यांच्या बॅक खात्यातुन स्वतःचे खात्यावर ट्रान्सफर करून घेवुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पवार ९८२३५४१०७६ |